# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 08.1.2026** **वार- गुरूवार**

---

<u>गाडगीळ</u>

ज्येष्ठ पर्यावरणतज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांचं काल रात्री पुण्यात अल्पशा आजारानं निधन झालं. ते ८३ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिव देहावर पुण्यात वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार होत आहेत. देशातील पर्यावरण चळवळीला वैज्ञानिक दिशा देणारे माधव गाडगीळ यांनी पश्चिम घाटाच्या संरक्षणासाठी गाडगीळ यांनी आयुष्य वेचलं. पश्चिम घाटाच्या जैवविविधतेवरील त्यांचं संशोधन अतिशय महत्वाचं ठरलं. त्यांच्या निधनानं सर्वच क्षेत्रामधून हळहळ व्यक्त होत आहे. राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी गाडगीळ यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

<u>निवडणूकप्रचार</u>

पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये सध्या महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू आहे. विविध पक्षांचे नेते आणि उमेदवार जनतेशी थेट संवाद साधून आपापल्या पक्षाचा प्रचार करत आहेत.

पिंपरी चिंचवडमधील पिंपळे सौदागर या प्रभागातील उमेदवारांच्या प्रचारासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज दुपारी ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधला. दररोज पिण्याचं पाणी, नियोजनबद्ध वाहतूक, नियमित स्वच्छता, अत्याधुनिक आरोग्य सुविधा, आणि खड्डेमुक्त, प्रदूषणमुक्त शहर ही पाच कामं प्राधान्याने करणार असल्याचं पवार म्हणाले. ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र नाट्यगृह आणि विरंगुळा केंद्रही उभारणार असल्याचं त्यांनी सांगितलं. या भागातील विकास अहवालाच प्रकाशनही अजित पवार यांच्या हस्ते झालं.

गेल्या नऊ वर्षात कंत्राटांमधील भ्रष्टाचार, विकास कामांमध्ये होणारा आर्थिक गैरव्यवहार तसंच निकृष्ट दर्जाची विकास कामं याविषयी अजित पवार यांनी टीका केली. तत्पूर्वी सकाळी पवार यांनी पिंपरी चिंचवडमधील ख्रिश्चन बांधवांशी संवाद साधला.

दरम्यान महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेसच्या माजी उपाध्यक्ष आणि पुणे महापालिका शिक्षण मंडळाच्या माजी अध्यक्ष संगीता तिवारी यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे.

भाजपा नेते आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आज मेट्रोमधून प्रवास करत माध्यमांच्या प्रतिनिधींशी संवाद साधला. पुणे महानगरपालिकेत भारतीय जनता पक्षाची सत्ता असताना अनेक विकासकामं झाली; मेट्रोरेल्वे, उड्डाणपूल, 24 तास समान पाणीपुरवठा योजना, चांगले रस्ते, पीएमपीसाठी नवीन बस गाड्या अशा अनेक गोष्टी पाच वर्षाच्या काळात सुरु झाल्या असं मोहोळ म्हणाले. पुणेकर सूज्ञ असून विकासाच्या बाजूने उभे राहतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

वंचित बहुजन आघाडीचे शहर अध्यक्ष अजित तायडे आणि सचिव बी.पी. सावळे यांनी आज माध्यमांशी संवाद साधला. महापालिका निवडणुकांसाठी वंचितकडून आघाडीला ४० जागांचा प्रस्ताव देण्यात आला होता. परंतु ही युती होऊ शकली नाही. याशिवाय काँग्रेसकडून चुकीचा प्रचार करण्यात आला. त्यामुळे वंचित बहुजन आघाडी स्वबळावर ४१ प्रभागांमध्ये ५८ उमेदवार निवडणूक लढवत असल्याचं तायडे यांनी सांगितलं.

**Pcmc**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी आज विविध प्रभागातील इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र आणि स्ट्रॉंग रूमची पाहणी केली. सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी ईव्हीएम आणि स्ट्रॉंग रूमच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य द्यावं असे निर्देश हर्डीकर यांनी दिले.

**यशदा**

पुण्यातील यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी इथं पंचायत राज मंत्रालयाच्या वतीने, ‘महिला मैत्री, ग्रामपंचायतींच्या सर्वोत्तम पद्धती” या विषयावर दोन दिवसांच्या राष्ट्रीय कार्यशाळेला आज सुरुवात झाली. या कार्यशाळेत देशातील १३ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांतील २०० हून अधिक प्रतिनिधी सहभागी झाले आहेत.कार्यशाळेचं उद्घाटन पंचायत राज मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव सुशील कुमार लोहानी यांच्या हस्ते झालं. महिलांचा ग्रामपातळीवरील निर्णय प्रक्रियेत सक्रिय सहभाग आणि सामाजिक जाणीव महत्त्वाची असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं. राज्य शासनाचे प्रधान सचिव एकनाथ दवाळे यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण देण्याची राज्याची भूमिका स्पष्ट केली.

**पंचायतराजअभियान**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचे दूत, अभिनेते भाऊ कदम यांनी नुकतीच बारामती तालुक्यातील काटेवाडी इथं भेट देऊन अभियानाच्या माध्यमातून झालेल्या विविध विकास कामांची पाहणी केली. यावेळी खासदार सुनेत्रा पवार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील उपस्थित होते. यावेळी कदम यांनी वृक्षारोपण करून सर्वांना पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला.

**पोलिसआयुक्त**

महिला आणि विद्यार्थी सुरक्षेला पोलिसांचं प्राधान्य असल्याचं पुण्याचे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितलं. पोलिस विभागाच्या स्थापना दिनानिमित्त एम आय टी संस्थेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात कुमार बोलत होते. अमली पदार्थांच्या पुरवठा करणाऱ्यांची माहिती विद्यार्थ्यांना असेल तर ती पोलिसांना द्यावी अस आवाहन आयुक्तांनी केलं.

**हवामान**

पुणे आणि परिसरात थंडीचा जोर पुन्हा वाढत असून आज ९ पूर्णांक ५ दशांश अंश सेल्सियस किमान तापमानाची नोंद झाली. उद्याही किमान तापमान १० अंशांच्या खालीच राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.